शुक्रवार दि. ०५ मे २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २७४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पत्रकारावर हल्ला म्हणजे लोकशाहीवर वार!

## संतोष भुतेकर प्रकरणाने जिल्हाभरात संतापाची लाट; जाफ्राबाद, मंठा, परतूर व टेंभुर्णीतील पत्रकार रस्त्यावर, दोषींना तात्काळ अटक करण्याची मागणी











**जालना -प्रतिनिधी**

दैनिक जगाचा जगमित्रचे संपादक तथा पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ जालना जिल्हाभरातील पत्रकार संघटना आक्रमक झाल्या असून जाफ्राबाद, मंठा, परतूर आणि टेंभुर्णी येथील पत्रकारांनी एकजूट दाखवत प्रशासनाला धारेवर धरले आहे. पत्रकाराला धमकावून, मारहाण करून किंवा दहशत निर्माण करून सत्य दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी ठाम भूमिका पत्रकारांनी घेतली आहे. विविध तालुक्यांतील पत्रकार संघटनांच्या वतीने पोलीस प्रशासन, तहसील प्रशासन तसेच राज्य शासनाला निवेदने सादर करण्यात आली. या निवेदनांमध्ये पत्रकारांवरील वाढत्या हल्ल्यांबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली असून, पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ आहेत. समाजातील भ्रष्टाचार, अवैध धंदे, गैरप्रकार आणि जनतेचे प्रश्न निर्भीडपणे मांडण्याचे काम पत्रकार करतात. अशा परिस्थितीत सत्य मांडणाऱ्या पत्रकारांवर हल्ले होणे ही अत्यंत गंभीर आणि निषेधार्ह बाब आहे. पत्रकारांना धमकावून गप्प बसविण्याचा प्रयत्न म्हणजे थेट लोकशाहीच्या गळ्यावर घाव घालण्यासारखे आहे. पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावरील हल्ल्याची सखोल चौकशी करून हल्ल्यामागील सूत्रधारांचा शोध घेण्यात यावा, संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर पत्रकार संरक्षण कायद्यासह कठोर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी पत्रकारांच्या सुरक्षेबाबत प्रभावी आणि ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता पत्रकार संघटनांनी व्यक्त केली. दरम्यान, जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील पत्रकारांनी या प्रकरणात अभूतपूर्व एकजूट दाखवली आहे.

मंठा : निवेदनावर ज्येष्ठ पत्रकार बाबूजी तिवारी , आशिष तिवारी, रवींद्र भावसार , गजानन माळकर ,सुरेश दवणे, महादेव पाखरे, मानसिंग बोराडे, अतुल खरात, शुभम बोराडे, विशाल वायाळ, ज्येष्ठ पत्रकार नागेश कुलकर्णी, संतोष दायमा , प्रदीप देशमुख, रवी बोराडे , संदीप गायकवाड, रणजीत बोराडे, राजेभाऊ भुतेकर, कृष्णा भावसार , दिनेश जोशी , बालाजी कुलकर्णी, पंडित बोराडे , डॉ. शबाब बागवान, जगदीश राठोड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

जाफ्राबाद : येथे पठाण सलमान खॉ. अजिसखॉ, सचिन चुंगडा, मुकेश भारद्वाज, विशाल पाबळे, शिरीष खंडेलवाल, मोहनराव मुळे, जहीर खॉन, हरी भालके, गोपाल बाहोरे, शेख अजिम, शेख अलतफ, भरत लहाने, प्रल्हाद लोणकर, चेतन बायस, ज्ञानेश्वर पाबळे यांनी निषेध नोंदविला.

टेंभुर्णी : मराठी पत्रकार संघाच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश राठोड यांना निवेदन देताना सुनिल भाले, रावसाहेब अंभोरे, पी. जी. तांबेकर, नसीम शेख, संजय राऊत, गजानन देठे, बी. डी. सवडे, अलकेश सोमाणी,अशोक पाबळे राज भाले दत्ता देशमुख बालाजी शेवाळे, साबेर शेख, फकरू कुरेशी, गजानन शेळके, सुनिल जोशी, आशपाक शेख, आशिष पैठणे शेख इंम्रान शेख गफुर शेख असद समीर शेख भिकन खाँ पठाण आदी पत्रकार उपस्थित होते.

परतूर : येथे शामसुंदर चित्तोडा, हनुमंत दवंडे, भाऊसाहेब पाटील मुके, राजकुमार भारूका, आशिष धुमाळ, सय्यद वाजेद, पांडुरंग शेजुळ, तारेख शेख, मुमताज अन्सारी, माणिक जैस्वाल, सागर काजळे, सरफराज नाईकवाडी यांनी प्रशासनाला निवेदन दिले.

जिल्हाभरातील पत्रकार संघटनांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, या प्रकरणातील आरोपींना अटक करून कठोर कारवाई न झाल्यास आंदोलनाची तीव्रता वाढविण्यात येईल. पत्रकारांवरील हल्ले सहन केले जाणार नाहीत आणि सत्यासाठी लढणाऱ्या पत्रकारांच्या पाठीशी संपूर्ण पत्रकारिता क्षेत्र ठामपणे उभे राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# आंदोलनाच्या इशाऱ्याची दखल; प्रभाग क्रमांक १० मध्ये साफसफाई

## माजी नगरसेवक विजय पवार यांच्या पाठपुराव्याला यश

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील माळीपुरा, कसबा, देढकरवाडी, गांधी चमन, शिस्त टेकडी व कुंडलिका नदी परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी माजी नगरसेवक विजय पवार यांनी महानगरपालिका प्रशासनाकडे वारंवार निवेदने देत तातडीने साफसफाईची मागणी केली होती.

मात्र प्रशासनाकडून अपेक्षित कार्यवाही होत नसल्याने विजय पवार यांनी आंदोलनाचा इशारा दिला. त्यांच्या या भूमिकेनंतर



महानगरपालिका प्रशासनाने तत्काळ दखल घेत शिस्त टेकडी, कुंडलिका नदी परिसरासह विविध भागांत साफसफाई मोहीम राबविली. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांना दिलासा मिळाला असून अनेकांनी माजी नगरसेवक विजय पवार यांचे आभार मानले आहेत. नागरिकांच्या समस्यांबाबत सातत्याने पाठपुरावा केल्यामुळेच प्रशासनाला जाग आली, अशी भावना नागरिकांनी व्यक्त केली.

विजय पवार नगरसेवक असताना त्यांच्या कार्यकाळात प्रभागातील रस्ते, नाल्यांची स्वच्छता व नागरी सुविधांमध्ये लक्षणीय सुधारणा झाली होती. त्यामुळे आजही नागरिक विविध समस्यांसाठी त्यांच्याकडे धाव घेत असल्याचे दिसून येत आहे.

याबाबत बोलताना विजय पवार म्हणाले, *(पान २ वर)*

# जालना पोलिसांची देहव्यापाराविरोधात धडक मोहीम; दोन स्वतंत्र कारवायांत लॉज मालक, व्यवस्थापकांसह आरोपी जेरबंद

## बसस्थानक परिसरातील दुर्गा लॉज आणि मोक्ष लॉजवर छापे; तीन पीडित महिलांची सुटका, मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात देहव्यापाराला आळा घालण्यासाठी सदर बाजार पोलीस ठाणे आणि विशेष पथकांनी राबविलेल्या धडक मोहिमेत दोन स्वतंत्र कारवायांद्वारे देहव्यापार चालविणाऱ्या लॉज व्यवस्थापनाविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. या कारवायांमध्ये लॉज मालक, व्यवस्थापक आणि एका ग्राहकासह अनेक आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू आणि अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या निर्देशानुसार सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली.

**दुर्गा लॉजवर छापा; व्यवस्थापकाविरोधात गुन्हा**

दिनांक ३ जून २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सदर बाजार पोलिसांनी जालना बसस्थानकाजवळील दुर्गा लॉज येथे छापा टाकला. या ठिकाणी बाहेरून महिलांना बोलावून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेतला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

छाप्यामध्ये आरोपी कल्याण अंकुश लोखंडे (वय ३६), रा. पिरपिपळगाव, ता. जि. जालना याला ताब्यात घेण्यात आले. आरोपी हा संबंधित लॉजमध्ये व्यवस्थापक म्हणून कार्यरत असल्याचे पोलिसांनी सांगितले. कारवाईदरम्यान १,८०० रुपयांची रोख रक्कम तसेच कंडोमची पाकिटे असा एकूण सुमारे २,३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४८६/२०२६ नोंद करण्यात आला असून अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियमांतर्गत कलम ३, ४, ५ व ६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल जाधव करीत आहेत. मोक्ष लॉजवर संयुक्त कारवाई; तीन महिलांची सुटका यापूर्वी २ जून २०२६ रोजी रामभाऊ राऊत चौकाजवळील मोक्ष लॉज येथेही सदर बाजार पोलिसांच्या डी.बी. पथकाने, भोकदन नाका चौकी आणि एएचटीयू पथकाच्या मदतीने संयुक्त छापा टाकला.

पोलीस उपनिरीक्षक सचिन सानप यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. तपासादरम्यान लॉज मालक व व्यवस्थापक हे आर्थिक फायद्यासाठी बाहेरून महिलांना बोलावून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेत असल्याचे निष्पन्न झाले.

या कारवाईत तीन पीडित महिलांची सुटका करण्यात आली. तसेच आरोपी सचिन नंदू पवार (वय ३०, रा. संभाजीनगर, जालना), संतोष भोलेनाथ जाधव (वय ३२, रा. खरपुडी) आणि नितेश कुमार रॉय यांच्यावर कारवाई करण्यात आली.

यावेळी ३,३०० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली असून संबंधित आरोपींविरुद्ध अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

दोन्ही कारवाया पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस *(पान २ वर)*





# पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दलित आदिवासी कास्तपट्टे नावे करण्यासाठी लक्ष घालावे अन्यथा जालना दौऱ्यात घेराव आंदोलन करू

## शिवसेना दलित आघाडी जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे यांचा इशारा

**जालना - प्रतिनिधी**

मराठवाड्यातील दलित आदिवासी,भूमीहिन, कास्तपट्टे नावे करून सातबाराला नोंद घेण्यासाठी शिवसेना दलित आघाडी गेले अनेक वर्षापासून जनआंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष करीत आहे. मात्र जिल्हा प्रशासन जिल्ह्यातील दलित आदिवासी कास्तकरांची दिशाभूल करून दलित आदिवासी कास्तकारांच्या उदरनिर्वाहाच्या प्रश्नाला बगल देत आहे. याकडे पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी दलित आदिवासी कास्तपट्टे नावे करण्यासाठी लक्ष घालावे अन्यथा शिवसेना दलित आघाडीच्या वतीने जालना



दौऱ्यावर घेराव आंदोलन करु, असा इशारा शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्करराव मगरे यांनी दिला. जालना येथे दलित आदिवासी कास्तकरांचा आज ४ जुन रोजी मेळावा घेण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी जालना यांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी शिवसेना दलित आघाडी जिल्हाप्रमुख भास्कर मगरे मार्गदर्शन करताना म्हणाले. पुढे बोलतांना ॲड. मगरे म्हणाले की, महाराष्ट्रातील दलित आदिवासी कास्तपट्टे नावे करून सातबारा उताऱ्याला नोंद घेण्याचे शासनाचे आदेश आहेत. मात्र प्रशासकीय स्तरावर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा चुकीचा अर्थ लावून जिल्ह्यातील दलित आदिवासी कास्तकारांची दिशाभूल करीत आहे. शिवसेना दलित आघाडीचे जिल्हास्तरावरील जेलभरो आंदोलनातून जालना जिल्हाधिकाऱ्यांना २७ ऑक्टोबर २०२५ च्या निर्देशाची अंमलबजावणी जगपाल सिंग विरुद्ध पंजाब निर्णय तसेच शासन निर्णय २८ नंबर १९९१ आणि शासन निर्णय १२ जुलै २०११ नुसार जालना जिल्हा पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दलित आदिवासी कास्टपटी नावे करून सातबारा उताराला नोंद घेण्याची आदेश द्यावे. कारण पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना २६ जानेवारी २०२६ आणि १ मे २०२६ रोजी जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी कास्तपट्टी *(पान २ वर)*

## संपादकीय...

### पत्रकारांसाठी वेगळा न्याय, गुन्हेगारांसाठी वेगळा? पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न

लोकशाही व्यवस्थेत पत्रकार हा केवळ बातमीदार नसतो, तर तो समाज आणि सत्ताधाऱ्यांमधील दुवा असतो. प्रशासनातील त्रुटी, भ्रष्टाचार, अवैध धंदे आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम पत्रकार करीत असतात. त्यामुळे पत्रकारांवर होणारे हल्ले हे केवळ एका व्यक्तीवरचे हल्ले नसून अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि लोकशाही मूल्यांवरचे हल्ले मानले जातात. अशा वेळी कायद्याचे रक्षक असलेल्या पोलिसांकडून निष्पक्ष, पारदर्शक आणि तत्पर कारवाईची अपेक्षा असते. मात्र जालना शहरातील अलीकडील घटनांनी ही अपेक्षा धुळीस मिळाल्याची भावना निर्माण झाली आहे. पत्रकार संतोष भुतेकर यांनी केलेल्या आरोपानुसार त्यांना बंदुकीचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. एखाद्या पत्रकाराला त्याच्या वृत्तांकनामुळे धमकावले जात असेल, तर त्यामागे केवळ वैयक्तिक वैर नसून पत्रकारितेला गप्प बसविण्याचा प्रयत्न असल्याचा संशय निर्माण होतो. त्यामुळे अशा प्रकरणात पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून तपास सुरू करणे अपेक्षित होते. मात्र तसे न झाल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. याच काळात पत्रकार राहुल मुळे यांच्याशी संबंधित प्रकरणात पोलिसांनी दाखविलेली तत्परता आणि भुतेकर यांच्या तक्रारीकडे पाहण्याचा दृष्टिकोन यामध्ये मोठा विरोधाभास दिसून येतो. एका प्रकरणात तक्रार मिळताच गुन्हा दाखल होतो, तर दुसऱ्या प्रकरणात पीडित पत्रकाराला प्रतीक्षा करण्यास सांगितले जाते. हा विरोधाभासच आज चर्चेचा विषय बनला आहे.

खरे तर कायद्याच्या दृष्टीने तक्रारदार कोण आहे, आरोपी कोण आहे किंवा त्याची सामाजिक, राजकीय अथवा आर्थिक ताकद किती आहे याला महत्त्व नसावे. कायद्याचा एकच मापदंड सर्वांसाठी लागू असला पाहिजे. परंतु जर सामान्य नागरिक किंवा पत्रकारांना असे वाटू लागले की काही प्रकरणांत पोलिस वेगाने धाव घेतात आणि काही प्रकरणांत संथ गतीने काम करतात, तर त्याचा थेट परिणाम न्यायव्यवस्थेवरील विश्वासावर होतो.

या प्रकरणातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे पत्रकार संरक्षणाचा प्रश्न. महाराष्ट्रात पत्रकारांवरील हल्ल्यांना आळा घालण्यासाठी कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. मात्र कायद्याचे अस्तित्व आणि त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये फरक असतो. जर पत्रकारांना धमक्या मिळाल्यानंतरही तातडीची कारवाई होत नसेल, तर त्या कायद्यांचा उपयोग नेमका कोणासाठी, असा प्रश्न उपस्थित होतो.

आज जालना जिल्ह्यात अवैध धंदे, गुटखा तस्करी, भ्रष्टाचार आणि स्थानिक गैरप्रकारांवर वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांवर दबाव वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अशा परिस्थितीत पत्रकारांना सुरक्षित वातावरण मिळणे ही केवळ त्यांची वैयक्तिक गरज नाही, तर लोकशाहीची आवश्यकता आहे. कारण भीतीच्या वातावरणात स्वतंत्र पत्रकारिता फुलू शकत नाही.

तथापि, कोणत्याही प्रकरणात अंतिम निष्कर्ष काढण्यापूर्वी पोलिसांची अधिकृत भूमिका आणि तपासातील तथ्ये समोर येणेही तितकेच महत्त्वाचे आहे. पत्रकारितेचा मूलभूत सिद्धांत म्हणजे दोन्ही बाजू ऐकणे. त्यामुळे संतोष भुतेकर यांच्या आरोपांची सखोल चौकशी होणे आणि पोलिस प्रशासनाने या प्रकरणात आपली भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे.

आजचा खरा प्रश्न संतोष भुतेकर किंवा राहुल मुळे एवढाच नाही. प्रश्न आहे तो कायद्याच्या समान अंमलबजावणीचा. जर न्यायाचा वेग व्यक्तीनुसार बदलत असेल, तर तो न्याय राहत नाही; तो संशयाचा विषय बनतो. म्हणूनच या प्रकरणात वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, संबंधित तक्रारींवर निष्पक्ष निर्णय घ्यावा आणि पोलिस प्रशासनावरील जनतेचा विश्वास अबाधित राखावा.

लोकशाहीत पत्रकार सुरक्षित असतील तरच समाज सुरक्षित राहतो. आणि कायद्याची विश्वासार्हता टिकवायची असेल, तर न्याय फक्त झाला पाहिजे असे नाही, तर तो निष्पक्षपणे आणि दिसेल अशा पद्धतीने झालेला दिसलाही पाहिजे.

## पर्यावरणाचा ऱ्हास की विकासाच्या नावाखाली विनाश?

दरवर्षी ५ जून रोजी जगभरात जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो.पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करणे,नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे आणि पृथ्वीच्या संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांना चालना देणे हा या दिवसामागील उद्देश आहे.मात्र पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपणाचे कार्यक्रम,परिसंवाद आणि विविध उपक्रम आयोजित केले जात असले तरी प्रत्यक्षात पर्यावरणासमोरील संकट दिवसेंदिवस अधिक गंभीर होताना दिसत आहे.आज मानवाने विकासाच्या शर्यतीत निसर्गाचा इतका मोठ्या प्रमाणावर ऱ्हास केला आहे की त्याचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत.गेल्या काही दशकांमध्ये औद्योगिकीकरण,शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या यामुळे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे.जंगलांची मोठ्या प्रमाणावर तोड,डोंगरांची उत्खनने,नद्यांचे प्रदूषण,वाढते हवेतील प्रदूषण आणि प्लास्टिक कचऱ्याचा विळखा यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे.एकेकाळी स्वच्छ आणि समृद्ध असलेली नैसर्गिक परिसंस्था आता मानवी हस्तक्षेपामुळे धोक्यात आली आहे.हवामान बदल हे आजच्या काळातील सर्वात मोठे पर्यावरणीय संकट मानले जाते.पृथ्वीचे तापमान सातत्याने वाढत असून त्याचे परिणाम जगभरात दिसून येत आहेत.अनेक देशांमध्ये विक्रमी उष्णतेच्या लाटा अनुभवास येत आहेत.काही ठिकाणी अतिवृष्टीमुळे पूरस्थिती निर्माण होत आहे,तर काही भागांमध्ये तीव्र दुष्काळामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचे प्रश्न गंभीर बनले आहेत.हिमनद्या वेगाने वितळत असून समुद्राची पातळी वाढत आहे.ही परिस्थिती भविष्यात किनारपट्टीवरील शहरांसाठी मोठा धोका ठरू शकते.भारतातही पर्यावरणीय संकटाची तीव्रता वाढत आहे.दरवर्षी उन्हाळ्यात तापमानाचे नवे विक्रम नोंदवले जात आहेत.अवकाळी पाऊस,गारपीट,चक्रीवादळे आणि अनियमित हवामानामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे.शेती उत्पादन घटत असून अन्नसुरक्षेचाही प्रश्न निर्माण होत आहे.ग्रामीण भागापासून महानगरांपर्यंत पर्यावरणाचा प्रश्न सर्वांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.मुंबईसारख्या महानगरांमध्ये विकास प्रकल्पांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल केली जात आहे.काँक्रीटच्या जंगलांमुळे शहरातील



हरित क्षेत्र कमी होत आहे.पावसाळ्यात नाले आणि जलवाहिन्या कचऱ्याने तुंबल्याने पूरस्थिती निर्माण होते.वायू प्रदूषणामुळे श्वसनाचे आजार वाढत आहेत.प्लास्टिक आणि इतर घनकचऱ्याच्या अयोग्य व्यवस्थापनामुळे पर्यावरणासोबतच नागरिकांच्या आरोग्यालाही धोका निर्माण होत आहे.प्लास्टिक प्रदूषण ही देखील एक गंभीर समस्या बनली आहे.प्लास्टिकचा वापर आज जीवनाचा अविभाज्य भाग झाला असला तरी त्याचे दुष्परिणाम अत्यंत घातक आहेत.प्लास्टिक सहज नष्ट होत नसल्याने ते माती, पाणी आणि सागरी पर्यावरणाचे नुकसान करते.नद्या आणि समुद्रात जाणाऱ्या प्लास्टिकमुळे जलचर प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे.अनेक प्राणी प्लास्टिक खाल्ल्यामुळे मृत्युमुखी पडत आहेत.त्यामुळे प्लास्टिकमुक्त जीवनशैली स्वीकारणे ही काळाची गरज बनली आहे.पर्यावरणाचा प्रश्न केवळ सरकार किंवा प्रशासनाच्या प्रयत्नांनी सुटणारा नाही.यासाठी प्रत्येक नागरिकाने जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.पाण्याचा अपव्यय टाळणे,ऊर्जा बचत करणे, सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढविणे,प्लास्टिकचा वापर कमी करणे,कचऱ्याचे वर्गीकरण करणे आणि अधिकाधिक वृक्षारोपण करणे यासारख्या उपाययोजना प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकारल्या पाहिजेत.पर्यावरण संरक्षणासाठी शाळा, महाविद्यालये,स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनीही सक्रिय भूमिका बजावली पाहिजे.पर्यावरण संवर्धनासाठी केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही,तर लावलेल्या झाडांचे संगोपन करणे तितकेच महत्त्वाचे आहे.विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणारी धोरणे राबविणे आवश्यक आहे.शाश्वत विकास हीच काळाची गरज आहे.आर्थिक प्रगती करताना निसर्गाचे नुकसान होणार नाही याची काळजी घेणे ही प्रत्येक शासनाची आणि समाजाची जबाबदारी आहे.जागतिक पर्यावरण दिन हा केवळ उत्सव साजरा करण्याचा दिवस नाही,तर आत्मपरीक्षण करण्याची संधी आहे.आपण निसर्गाकडून सतत घेत आहोत,परंतु त्याला परत काय देत आहोत,हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे. पर्यावरणाचा ऱ्हास हा केवळ निसर्गाचा प्रश्न नाही,तर तो मानवाच्या अस्तित्वाशी निगडित आहे.आज आपण जागे झालो नाही,तर उद्याची पिढी आपल्याला कधीही माफ करणार नाही.म्हणूनच पर्यावरणाचे संरक्षण ही काळाची गरज नसून मानवजातीच्या अस्तित्वासाठीची अपरिहार्यता आहे.निसर्ग वाचला तरच भविष्य वाचेल,आणि भविष्य वाचवायचे असेल तर पर्यावरण संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल.



**- केतन द.भोज**
**सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई**

## अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात दि. ६ जुन, २०२६ रोजी शिवराज्याभिषेक सोहळा, दि. १७ जुन, २०२६ रोजी महाराणा प्रताप जयंती, राजमाता जिजाऊसाहेब भोसले पुण्यतिथी (तारखेप्रमाणे),मोहरम, इत्यादी जयंती, पुण्यतिथी, सण उत्सव साजरे होणार आहेत. सदर सण, उत्सव, जयंती, पुण्यतिथीचे अनुषंगाने जालना जिल्ह्यात व शहरात मिरवणुका व विविध कार्यक्रम आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असतात. तसेच मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण बचाव व धनगर समाज एस. टी. प्रवर्गात समाविष्ठ करावे या अनुषंगाने जालना जिल्ह्यात विविध प्रकारचे आंदोलन कार्यक्रम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे अनुचित प्रकार घडून कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो.

तसेच महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या सत्ताधारी व विरोधकात एकमेकांविरुध्द गटबाजी व आरोप प्रत्यारोप विविध कारणांवरुन सुरु आहेत. तसेच शेतकऱ्यांचे विविध मागण्यासाठी विविध संघटनाकडून आत्मदहन,उपोषण, धरणे मोर्चे, निर्दशने, रास्तारोको इत्यादी सर्व प्रकारची आंदोलनात्मक कार्यक्रम घेण्याची शक्यता नाकारतायेत नाही.

त्यामुळे अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही.

तसेच अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे. हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही.

हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि.६ जुन, २०२६ रोजीच्या ६.०० वाजेपासुन ते दि. २० जुन, २०२६ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### महाराष्ट्र लोकभवन येथे तेलंगणा राज्य स्थापना दिन साजरा

**मुंबई -वृत्तसेवा**

महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी ३ जून रोजी महाराष्ट्र लोकभवन येथे तेलंगणा राज्याचा स्थापना दिवस सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. लोकभवन मुंबई येथे वर्मा फाउंडेशन आणि फेडरेशन ऑफ तेलगू असोसिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या सहकार्याने आयोजित केला होता. या संस्थेच्या कलाकारांनी तेलंगणा राज्याची लोकगीते व लोकनृत्ये सादर केली. तेलंगणा राज्याचे पारंपरिक गीत जय जय हे तेलंगणा, आंदे श्री तसेच वंदे शिवम शंकरम ही गीते देखील सादर करण्यात आली. तेलंगणाचे राज्यपाल शिव प्रताप शुक्ला यांचा व्हिडिओ संदेश देखील यावेळी दाखविण्यात आला.

कलाकारांनी रंगीबेरंगी बथुकम्मा, बोनालू आणि इतर पारंपरिक नृत्यप्रकारांनी तेलंगणाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे सुंदर दर्शन घडविले. नाट्य शिरोमणी शेख नादिया यांचे सादरीकरण विशेष उल्लेखनीय होते. त्यांच्या कलात्मकतेने आणि भावपूर्ण अभिनयाने उपस्थित प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले अशा शब्दांत राज्यपालांनी कौतुक केले. भारत सरकारच्या एक भारत श्रेष्ठ भारत उपक्रमाचा भाग म्हणून तेलंगणा राज्य स्थापना दिवस लोकभवन येथे आयोजित करण्यात आला होता.

### संपन्न महाराष्ट्रासाठी पायाभूत सुविधांचे निर्मिती प्रकल्प गतीने पूर्ण करावेत - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई - वृत्तसेवा**

महाराष्ट्राच्या संपन्नतेसाठी पायाभूत सुविधांच्या निर्मिती प्रकल्पांची कामे गतीने पूर्ण होणे गरजेचे आहे. संबंधित यंत्रणांनी प्रकल्प पूर्णत्वातील अडचणी दूर कराव्यात. कंत्राटदाराला देण्यात आलेल्या कालावधीत प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे याकडे संबंधित यंत्रणांनी लक्ष द्यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. विलंबाने काम पूर्ण करणाऱ्या कंत्राटदारांना पुढील कुठलेही नवीन काम संबंधित यंत्रणेने देऊ नये, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या. सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित पायाभूत सुविधा मुख्यमंत्री वॉर रूम बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस प्रकल्पांचा आढावा घेताना ते बोलत होते. कुठल्याही परिस्थितीत पायाभूत सुविधांचे प्रकल्प हा तीन ते साडेतीन वर्षांमध्ये पूर्ण झाला पाहिजे, असे निर्देश देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, निविदा प्रक्रिया राबवताना त्यामध्ये कंत्राटदाराने मागील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लावलेल्या कालावधीच्या निकषाचाही समावेश असावा. कंत्राटदारांनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विलंब केल्यास देशाचे व पर्यायाने राज्याचे नुकसान होते. त्यामुळे कुठल्याही परिस्थितीत प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये होणारा विलंब खपवून घेतला जाणार नाही. प्रकल्पाच्या पूर्णत्वामध्ये अनेक अडचणी असतात. मात्र यंत्रणांनी अडचणींवर मात करीत पुढे वाटचाल केली पाहिजे. धारावी झोपडपट्टी पुनर्विकास आढावा घेताना मुख्यमंत्री म्हणाले की, धारावी मधील उद्योजकांना स्टेट जीएसटीमधून सवलत मिळण्याबाबत कार्यवाही करावी. यामुळे धारावीमधील उद्योगांना बळ मिळेल. तेथील इन्फॉर्मल इकॉनोमी ही फॉर्मल होईल. धारावी पुनर्विकाससंदर्भात निविदा प्रक्रियेत असलेल्या विषयांबाबत पुन्हा मंत्रिमंडळासमोर येण्याची आवश्यकता नाही,याबाबत यंत्रणेने संबंधित विभागांशी चर्चा करून समन्वयाने मुद्दे सोडवावेत. ना.म जोशी मार्ग, नायगाव, वरळी येथील बीडीडी चाळींचा पुनर्विकास करताना तेथील रहिवाशांना भाडे देऊन सध्या राहत असलेली घरे विनाविलंब ताब्यात घेत तिथे पुनर्विकास सुरू करावा.

पान १ व ४ वरुन....

### आंदोलनाच्या इशाऱ्याची...

''महानगरपालिकेवर कोणत्याही पक्षाची सत्ता असो, आमची लढाई ही नागरिकांच्या प्रश्नांसाठी आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेविरुद्ध आहे. प्रभागातील स्वच्छता, आरोग्य आणि मूलभूत सुविधा यासाठी आम्ही पुढेही संघर्ष करत राहू.''

दरम्यान, प्रभाग क्रमांक १० मधील साफसफाईमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून भविष्यातही स्वच्छता नियमित ठेवण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात येत आहे. यावेळी शाम जमधड़े जाकेर शेख हायखाना अनिल घड़लीगे अकाश गायकवाड संजय पवार रामलाल जाधव या सह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

### जालना पोलिसांची...

अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. पोलीस निरीक्षक संदीप भारती, सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंदसिंग साबळे यांच्या नेतृत्वाखाली डी.बी. पथकाचे प्रमुख पोउपनि सचिन सानप, पोहेकॉ बाबा हरणे, निकम, देशमुख, गोतीस, खंडागळे तसेच एएचटीयूचे ग्रेपोउपनि रवि जोशी, ग्रेपोउपनि संजय गवळी, अझीम शेख, धनंजय लोहे, मुंजाळ आदी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

देहव्यापाराविरोधात पोलिसांची कठोर भूमिका जालना शहरात देहव्यापार, मानवी तस्करी आणि महिलांच्या शोषणाविरोधात पोलीस प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून अशा अवैध व्यवसायांविरोधात पुढेही सातत्याने विशेष मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. या सलग कारवायांमुळे शहरातील अवैध धंदे चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### पालकमंत्री पंकजाताई मुंडे...

नावे करून सातबारा देण्याची विनंती निवेदनामधून केलेली आहे. २९ मे शुक्रवारी महाराष्ट्र राज्याचे अप्पर मुख्य सचिव विकास खर्गे जालना दौऱ्यावर असताना जिल्हाधिकारी आणि सर्व उपविभागीय अधिकारी यांच्यासमोर शासन निर्णय २८

नोव्हेंबर १९९१ आणि जगपाल सिंग विरुद्ध पंजाब शासन तसेच शासन निर्णय १२ जुलै २०११ नुसार चर्चेदरम्यान अनुसूचित जाती अनुसूचित जमाती कास्तगारांच्या गायरान जमिनीवरील अतिक्रमण नियमानुकलता बाबत दिलेले अपवादात्मक तरतुदीचे स्पष्ट मार्गदर्शक निर्देश आणि सर्वोच्च न्यायालयाच्या जगपाल सिंग प्रकरणातील निर्णय व त्यातील यशस्वी भूमीहिन कास्तकारांसाठी अपवादात्मक तरतुदीचे महसूल व वन अप्पर मुख्य सचिव विकास खर्गे यांचे स्पष्टीकरण बघता न्यायालयीन आदेश आणि शासन निर्णय समोर ठेवून विहित काल मर्यादित ठोस कार्यवाही करण्याचे लेखी निर्देश पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा प्रशासनास द्यावे. अन्यथा शिवसेना दलित आघाडीच्या वतीने पालकमंत्री जालना दौऱ्यात घेराव आंदोलन करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या सर्वोच्च प्रशासकीय पद प्राधिकाऱ्याचे मार्गदर्शन व पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना दिलेले निवेदनाचे निर्देश पाळणे ही अधिनस्त अधिकाऱ्यांची विधीसंगत व अनिवार्य जबाबदारी असून त्याचे अनुपालन करण्याची विनंती आहे. जालना तालुक्यातील

दलित आदिवासी कास्तकारांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

### पत्रकार - पोलीस...

तेजबीर सिंग सिंधू यांनी पत्रकारांनी प्रशासनाला दिलेल्या सहकार्याबद्दल समाधान व्यक्त करत भविष्यातही हा समन्वय कायम ठेवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात पत्रकार आणि पोलीस प्रशासन यांच्यातील संवाद अधिक मजबूत करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

### श्रीमती. जे.बी.के....

प्रमुख. कैलास भुतेकर, राजेश शेवाळे, राजेंद्र जगताप, रविंद्र मोरे, समाधान कांबळे, दिनकर ऊखर्डे, दत्तात्रय ऊखर्डे, प्रा. सुनील बनसोडे, डॉ. अरूण आहेर, प्रा. रामदास भांगे, प्रा. कैलास जाधव, प्रा.जी.टी.धोटे, डॉ. आनंद जाधव, वासुदेव क्षिरसागर, उज्वला आवटी, मंजुषा भिलावेकर,माधुरी पाटील, एफ. ए. शेख, ज्योतीताई जाधव, विजया शिल्लार,कार्यालयीन प्रमुख. सुनिल सकुंडे, प्रयोगशाळा सहाय्यक. राजुभाऊ डोमळे, नागोराव देशमुख, दिपक देशमुख, विनोद देशमुख आदींनी, अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.

### अनुसूचित जाती...

आहे. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी या निवासी शाळांमध्ये विविध इयत्तांतील जागा रिक्त असून, पात्र विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांनी केले आहे.

### अल्पवयीन मुलांच्या...

पाहिजे.खालच्या न्यायालयांचे निर्णय रद्द करताना, सर्वोच्च न्यायालयाने आईचा युक्तिवाद स्वीकारला की, जमिनीतील अविकसित आणि अविभक्त हिश्यापेक्षा एक तयार निवासी युनिट आणि रोख रक्कम अल्पवयीन मुलासाठी तात्काळ आणि ठोस फायदे देऊ शकते. न्यायालयाने म्हटले की, अशा प्रकारे मुलाचे हित साधणे हेच कायद्याचा खरा उद्देश आहे. या निरीक्षणासह, न्यायालयाने आईला विकास करार करण्याची परवानगी दिली. या निकालावर भाष्य करताना कायदेतज्ज्ञ ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले की, ''सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत दूरगामी आणि अल्पवयीन मुलांच्या हिताचे रक्षण करणारा आहे. अनेकदा गरज किंवा आवश्यकता या शब्दांच्या तांत्रिक अर्थामुळे मुलांचे वास्तविक फायदे नाकारले जात होते. न्यायालयाने स्पष्ट फायदा या तत्त्वाला प्राधान्य देऊन पालकांना मुलांच्या भवितव्यासाठी अधिक व्यवहार्य आणि फायदेशीर निर्णय घेण्यास वाव दिला आहे. यामुळे मालमत्तेचे व्यवस्थापन अधिक सुलभ होईल आणि खटल्यांचा अनावश्यक भार कमी होण्यास मदत होईल.''

### परळी वैजनाथ...

यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी त्यांनी केलेला संघर्ष, ग्रामीण भागाच्या विकासासाठी दिलेले योगदान, तसेच समाजहितासाठी केलेल्या कार्याचे स्मरण करण्यात आले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना विनम्र अभिवादन करून त्यांच्या स्मृतीस श्रद्धांजली अर्पण केली.

### जिल्हाअधिकारी तथा...

आयुष्यमान भारत केवायसी करून घ्यावी व आयुष्यमान भारत कार्ड लाभार्थी वंचित राहू नये असे आदेश श्रीमती आशिमा मित्तल यांनी दिले दि. ३-६-२०२६ मंगळवारी टेंभुर्णी ग्रामपंचायत कार्यालयात आयुष्यमान भारत केवायसी चे कॅम्प घेण्यात आले यावेळी स्वस्त धान्य दुकानदार काशिनाथ मुनेमाणिक फैयाज बागवान सतीश काबरा नासेर चाऊस ग्रामपंचायत कर्मचारी विक्रम उकांडे अजिस बागवान कम्प्युटर ऑपरेटर बाबासाहेब जमदधडे दिगंबर भिसे सुनिल भाले गणेश म्हस्के बनसोडे सुपरवायझर रेखा सपकाळ अनिता इंगळे दिपाली घोडके धारे आयुष्यमान भारत कार्डधारक कॅम्प साठी यांची उपस्थिती

### महिला आघाडीच्या...

कुटुंबीयांसोबत आनंदाचे क्षण वाटण्याचा प्रयत्न केला. यावेळी महिला रुग्णांना फळ व नवजात बालकांना दुपट्ट्यांचे वाटप करण्यात आले तसेच बाल रुग्णांसाठी टेडी बेअर, कार्टून बेडशीट्स, फळे व वृक्षरोपांचे वितरण करण्यात आले. गौरक्षण पांजरपोळ येथे भेट देऊन गोमातांना चारा दान करण्यात आला. यावेळी उद्योजक रमेश घुगे,इरा घुगे, शारदा जायभाये, रोकडे,दीपक धर्माधिकारी, विशाल निखळजे, कृष्णा वाघ आदींची उपस्थिती होती.

# अंधश्रद्धा आणि बुवाबाजी : बुद्ध विचारांची गरज -दारोकार गुरुजी

**दत्ता देशमुख**

आजच्या विज्ञानयुगात माणूस चंद्रावर पोहोचला, तंत्रज्ञानाच्या मदतीने जग जवळ आले; पण तरीही समाजातील अंधश्रद्धा आणि बुवाबाजी पूर्णपणे नाहीशा झालेल्या नाहीत. उलट काही ठिकाणी त्या अधिकच बळावताना दिसतात, ही चिंतेची बाब आहे.

दारोकर गुरुजी आपल्या मार्गदर्शनात सांगतात की, अंधश्रद्धा म्हणजे विचारशक्तीला न जुमानता कोणत्याही गोष्टीवर अंधपणे विश्वास ठेवणे होय. अशा अज्ञानाचा फायदा घेऊन काही भोंदू लोक स्वतःला 'बाबा', 'गुरु' म्हणून सादर करतात आणि लोकांची फसवणूक करतात. हीच बुवाबाजी समाजासाठी घातक ठरते.

याच ठिकाणी भगवान बुद्ध यांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. बुद्धांनी कधीही अंधानुकरणाला प्रोत्साहन दिले नाही. त्यांनी स्पष्ट सांगितले की

''कोणतीही गोष्ट केवळ परंपरेने, ऐकून किंवा कोणीतरी सांगितल्यामुळे स्वीकारू नका; ती स्वतःच्या बुद्धीने तपासा.''



बुद्धांचा ''अप्प दीपो भव'' हा संदेश माणसाला स्वतःचा मार्ग स्वतः शोधण्याची प्रेरणा देतो. त्यांनी तर्क, अनुभव आणि प्रज्ञा यावर भर दिला. त्यामुळे बुद्धधर्म हा अंधश्रद्धेचा नाही, तर विवेक आणि विज्ञानाचा मार्ग आहे. आज अनेक लोक आपल्या समस्या सोडवण्यासाठी डॉक्टर, तज्ज्ञ किंवा योग्य मार्गदर्शकांकडे न जाता बुवाबाजीकडे वळतात. यामुळे त्यांचे आर्थिक, मानसिक नुकसान होते. काही वेळा तर अशा अंधविश्वासामुळे जीवितहानीही होते. दारोकार गुरुजी पुढे सांगतात की, खरा धर्म माणसाला मुक्त करतो, भीतीमध्ये ठेवत नाही. जो धर्म भीती निर्माण करतो, तो खरा धर्म नसतो. बुद्धांनी दुःखातून मुक्तीचा मार्ग सांगितला, भीती निर्माण करणारा नव्हे. समाजातील प्रत्येकाने वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. मुलांना प्रश्न विचारायला प्रोत्साहित केले पाहिजे. शिक्षणातून विवेक, मानवता आणि समता या मूल्यांची जोपासना केली पाहिजे. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष राजेश सदावर्ते, कोषाध्यक्ष अरुण वाघमारे, उपाध्यक्ष कुणाल दहिवले, माधव पात्रे, संघटक शेषराव सोनवणे, तक्षशिला बुद्ध विहाराचे अध्यक्ष भिकाजी साळवे, संदीप इंगोले, अशोक गंगावणे, चंद्रकांत वाघमारे, संभाजी कांबळे, कुलदीप गरड, गणपत भद्रे पर्यटन मंत्री, गुमनराव पारखे ,प्रा. डॉ. राजकुमार म्हस्के, राहुल वाकडे, महेंद्र शिंदे, प्रमोद गायकवाड, प्रकाश मगरे सर्व उपासक व उपासिका उपस्थित होते.

# राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया व कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत प्रक्रिया उद्योगांना मोठे अनुदान

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सोयाबीन, मोहरी व इतर तेलबिया तसेच तूर, हरभरा आणि इतर कडधान्य पिकांचे काढणीनंतर होणारे नुकसान कमी करून स्थानिक पातळीवर मूल्यवर्धनाला चालना देण्यासाठी कृषी विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. केंद्र शासनाच्या 'राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (-)' आणि 'कडधान्य आत्मनिर्भरता अभियान २०२६-२७ अंतर्गत काढणीपश्चात पायाभूत सुविधा उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले असून, पात्र लाभार्थ्यांकडून ऑफलाइन अर्ज मागविण्यात येत आहेत. २५० मे. टन क्षमतेच्या गोदामासाठी १४.४० लाखांपर्यंत अनुदान तेलबियांच्या सुरक्षित साठवणुकीसाठी २५० मे. टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी मार्गदर्शक सूचनांनुसार प्रति मे.टन ११,५२१ रुपये खर्च निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार गोदामाचा एकूण अंदाजित खर्च २८ लाख ८० हजार २५० रुपये असून, पात्र लाभार्थ्यांना प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल १४.४० लाख रुपये इतके अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेसाठी शेतकरी उत्पादक संस्था (/), सहकारी संस्था, सरकारी व खाजगी उद्योग तसेच समूह आधारित व्यवसाय संस्था () पात्र आहेत. मूल्य साखळी भागीदार () गटांना निवड प्रक्रियेत विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. लाभार्थ्यांची निवड 'प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य' () या तत्त्वावर होणार असून, गोदामाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग () किंवा केंद्रीय वखार महामंडळ () यांच्या निकषांनुसार करणे बंधनकारक राहणार आहे.

तेल काढणी युनिटसाठी ९.९० लाखांपर्यंत मदत तेलबिया प्रक्रियेसाठी आवश्यक यंत्रसामग्री व उपकरणांच्या खरेदीसाठी कृषी विभागाने स्वतंत्र अनुदानाची तरतूद केली आहे. १० टन प्रतिदिन क्षमतेच्या तेल काढणी युनिटसाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के किंवा कमाल ९.९० लाख रुपये अनुदान मिळणार आहे. तसेच लघु स्तरावरील प्रक्रिया उद्योगांसाठी मिनी ऑईल मिल आणि एक्सपेलर युनिटलाही आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. फिल्टर प्रेससह मिनी ऑईल मिलसाठी युनिट किमतीच्या ४० ते ५० टक्के किंवा कमाल ४ लाख रुपये, तर फिल्टर प्रेसशिवाय मिनी ऑईल मिलसाठी ४० ते ५० टक्के किंवा कमाल ३ लाख रुपये अनुदान दिले जाणार आहे.

# सिंचन विहीरीवर स्वत: गटविकास अधिकारी : घेतली मजूरांची हजेरी

## जाणून घेतल्या रोजगार सहाय्यक यांच्या अडचणी




**औसा | प्रतिनीधी**

औसा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आनंदकुमार मिरगणे यांनी सिंचन विहीरीवर उपस्थित प्रत्यक्षात मजूरांची हजेरी घेतली.याबदल सविस्तर माहिती अशी की १मार्च २०२६ पासून केंद्र शासनाने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने (मग्रारोहयो) अंतर्गत सुरू असलेल्या सर्व वैयक्तीक, सार्वजनिक कामांवर फेस अथेटिफिकेन्श म्हणजे प्रत्यक्षात मजूरांची कामांच्या ठिकाणी आँनलाईन दोन वेळा हजेरी घेण्यांची जाचक अट घातली असून स्थानिक पातळीवर रोजगार सहाय्यक यांना यामध्ये मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. नेटवर्क प्राब्लेम,साईड प्राब्लेम , तांत्रिक अडचणी त्यामुळे मोठ्या प्रमाणात अडचणी वाढत होत्या.त्यामुळे आज गटविकास अधिकारी मिरगणे यांनी औसा तालुक्यातील सिरसल थेट सिंचन विहिरीच्या कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट दिली येथे रोजगार सहाय्यक यांना येणाऱ्या अडचणी समजून आँनलाईन हजेरी घेताना येणाऱ्या अडचणी समजून घेत तेथील सिंचन विहीर लाभार्थी शेतकरी संतोष बळी घोडके यांच्या शेतात जाऊन प्रतक्षात कामांवर उपस्थित असणाऱ्या मजूरांची ऑनलाईन हजेरी घेत समस्या जाणून घेतल्या.ग्रामीण भागातील मजुरांचे नुकसान होऊ नये आणि कामात खंड पडू नये, यासाठी गटविकास अधिकारी यांनी स्वतः पुढाकार घेतला. यावेळी सिरसल चे सरपंच प्रकाश पाटील,उपसरपंच बालाजी हांडे, ग्राम पंचायत अधिकारी माधव गिरी,ग्राम रोजगार सहाय्यक व कामावरील मजूर,ग्रामस्थ महेश जगताप ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# नूतन सहाय्यक पोलीस निरीक्षक, अविनाश राठोड यांचा प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र शाखा जाफराबाद तर्फे सत्कार

**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी तालुका जाफराबाद जिल्हा जालना, ऐतिहासिक ठेवा असलेल्या या गावच्या पोलीस स्टेशनमध्ये, पोलीस स्टेशनचे नूतन प्रभारी अविनाश राठोड यांची सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी नुकतीच नियुक्ती झाली आहे. प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र शाखा जालना जाफराबाद तसेच लहू शास्त्र सेना तालुका जाफराबाद तर्फे सत्कार करण्यात आला. याप्रसंगी चर्चेदरम्यान त्यांना जाफराबाद तालुका तसेच टेंभुर्णी गावाच्या इतिहासाची माहिती देण्यात आली. विविध उपक्रमाबाबत ही चर्चा करण्यात आली. वाहनचालक व वाहतूक व्यवस्था यावर विशेष भर देण्यात आला. वाहतूक व्यवस्थेत व्यवस्थितरित्या शिस्त लागून कमी वयाच्या वाहनचालकाच्या बाबतीत सुद्धा चर्चा करण्यात आली. त्यांनी ऐतिहासिक गावाचा ठेवा




आहे यावर विशेष लक्ष केंद्रित केले आणि अशा ऐतिहासिक गावात माझी नियुक्ती झाली यावर त्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र शाखा जालना चे उपाध्यक्ष प्रा. दत्ता देशमुख, प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र जाफराबाद शाखेचे अध्यक्ष शेख अशपाक, व लहू शास्त्र सेनेचे जाफराबाद तालुका अध्यक्ष युसुफ शेख, यांच्यातर्फे नूतन प्रभारी यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

# जिल्हाधिकारी कार्यालयात आज कर्मचारी समाधान शिबिराचे आयोजन

**जालना - प्रतिनिधी**

शासन सेवेतील कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणी तातडीने आणि कार्यक्षमतेने सोडवण्यासाठी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण विभागात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी कर्मचारी समाधान शिबीर आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जून महिन्यातील जिल्हास्तरीय शिबिराचे आज शुक्रवार, दि. ५ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथील नियोजन भवनात सकाळी ११ वाजता आयोजन करण्यात आले आहे. तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली, जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तर विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. तसेच जिल्हास्तरावरील अडचणी जिल्हाधिकारी कार्यालयातील तर तालुका स्तरावरील अडचणी या तहसिल कार्यालयातील आणि विभागीय पातळीवरील अडचणी या विभागीय आयुक्त कार्यालयातील शिबीरात स्विकारण्यात येणार आहे. अर्जदार अधिकारी / कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी यांना शिबीरास उपस्थित राहून कर्मचाऱ्यांच्या समस्या मांडण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# पोस्को महाराष्ट्र स्टील सहयोगाने ९ जून रोजी गोरेगाव बुद्ध विहार येथे वणवे व पर्यावरण संवर्धन या विषयावर किशोर पवार यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**बोरघर -प्रतिनिधी**

सध्या सर्वत्र वणणे लावण्याची कुत्सित प्रवृत्ती वाढत चालली आहे. वणवे लावल्याने निसर्ग , पर्यावरण आणि जैवविविधतेचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तर दुसरीकडे ग्लोबल वॉर्मिंग चे दुष्परिणाम सर्व जगाला भोगावे लागत आहेत. हे सर्व थांबवले पाहिजे. माती, पाणी, पर्यावरण जपणं ही आपली सगळ्यांचीच जबाबदारी आहे. या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील महाड येथील भीवघर गावाचं दहा वर्षांपेक्षा जास्त अनुभवाचे उदाहरण खरंच प्रेरणादायी आहे, सगळे एकत्र आलो तर बदल नक्की घडतो.

शेती - माती, पाणी, पर्यावरण सुस्थितीत रहावे ही आपलीच नाही तर पुढच्या पिढ्यांचीही गरज आणि आपली जबाबदारी आहे, गेल्या काही वर्षांत वातावरण बदल अश्या काही समस्यांना आपण सामोरे जात आहोत यांत वणवे लावण्याची समस्या आपण सगळे जाणतोच यांची कारणे व कृती आराखडा चर्चा करण्यासाठी आपण सर्व एकत्र येवूया. महाड मधील भीवघर व काही गावांनी ठरवून गेली १० वर्ष पेक्षा अधिक एक उत्तम उदाहरण घालून देत गावांनी एकत्र मिळून या संदर्भात काम केले व याचे अनेक लाभ त्यांच्या लक्षात आले आहेत असंच काही आपणही करू शकतो. या करिता बुद्ध विहार, गोरेगांव येथे मंगळवार दिनांक ९ जून २०२६ दुपारी ठीक ३ वाजता पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीच्या वतीने वक्ते श्री. किशोर पवार, भीवघर, महाड यांचे वणवे व पर्यावरण संवर्धन कृती आराखडा या विषयावर शेतकऱ्यांना मौलिक मार्गदर्शन आयोजित करण्यात आले आहे. तरी तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी चे महा व्यवस्थापक माननीय श्री महेन्द्र तट्टे साहेब आणि सीएस आर फंड व्यवस्थापक टीम प्रमुख माननीय श्री कुलदीप पुरंदरे साहेब यांनी केले आहे. सदर कार्यशाळेस उपस्थित राहणाऱ्या सर्वांची दुपारी भोजनाची आणि नास्त्याची व्यवस्था पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी च्या वतीने करण्यात आली आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे.

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया !

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरण परिषदेत मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक लेस्टर ब्राऊन यांनी म्हटले आहे की, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी वंगारी मथाई यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात. महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी ५० कोटी वृक्ष लागवड अभियान राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून - जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मॅंग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत. हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे. पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे.




प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत. जल, जमीन आणि जंगल ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे.मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते.जून महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतः ची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे.पर्यटनाला जाताना सोबत सीडबॉल घेऊन जाणे,जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे.मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही; त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे. आज गरज आहे ती निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून अभय देण्याची. जलसाठ्यांचे संरक्षण, नदीपात्रांचे जतन, सांडपाणी व्यवस्थापन,जंगलांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण,अक्षय ऊर्जा निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर या माध्यमातून आपण पर्यावरण समृद्ध करू शकतो. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक झाड, एक जलस्रोत आणि एक पर्यावरणपूरक सवय यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तर हरित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीचा मार्ग अधिक सुकर होईल.

**प्रवीण टाके**
**उपसंचालक**
**विभागीय कार्यालय,**
**कोल्हापूर**
**९७०२८५८७७७**

# पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या 'विश्वास, विकास व जनकल्याण' अभियानांतर्गत जालना येथे जिल्हास्तरीय कार्यशाळा संपन्न

**जालना - प्रतिनिधी**

आज भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा कार्यालय, जालना येथे मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या ''विश्वास, विकास व जनकल्याण'' अभियानांतर्गत जालना ग्रामीण व जालना महानगर या जिल्हयाच्या वतीने जिल्हास्तरीय या कार्यशाळेत जून महिन्यात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांच्या नियोजनाबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यामध्ये मोदी सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यकाळानिमित्त मीडिया संवाद, विशेष जनसंपर्क अभियान, जनकल्याण शिबिरे, संवाद संमेलने, उपलब्धी प्रदर्शन तसेच नैसर्गिक शेती शाळा आदी कार्यक्रमांचा समावेश आहे. तसेच, ५ जून रोजी साजऱ्या होणाऱ्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्रत्येक मंडळात ''एक झाड आईच्या नावाने'' या संकल्पनेतून ५०० वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. यासाठी शाळा, महाविद्यालये तसेच सामाजिक व व्यावसायिक संस्थांचा सहभाग वाढविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



२१ जून रोजीच्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त प्रत्येक मंडळात योग शिबिरांचे आयोजन करून योगतज्ज्ञांना आमंत्रित करण्यात यावे असेही सांगण्यात आले.

तसेच, २५ जून १९७५ रोजी लागू करण्यात आलेल्या आणीबाणीच्या ५१ व्या वर्षानिमित्त ''काळा दिवस'' कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत चर्चा करून नियोजन करण्यात आले. यावेळी सर्व समिती संयोजक व सहसंयोजकांची बैठक घेऊन कार्यक्रमांची रूपरेषा, जबाबदाऱ्यांचे वाटप आणि अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच आयोजित करण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांचे फोटो, व्हिडिओ आणि आवश्यक माहिती वेळेत सरल ॲप व नमो ॲपवर अपलोड करावे. यावेळी भाजपा जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर (आबा) दानवे, महापौर वंदना मगरे, स्थायी समिती सभापती अशोक अण्णा पांगारकर, रामेश्वर भांदरगे, बद्रीनाथ पठाडे, भिमराव जावळे, सिद्धिविनायक मुळे, अनिल कोलते, धनराज काबलिये, वसंत शिंदे सुनील पवार, शिवप्रकाश चितळकर, अमोल कारंजेकर, गोविंद ढेंबरे, अर्जुन गेही, विश्वजीत खरात, तसेच महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा संध्याताई देठे यांच्यासह नगरसेवक, मंडळ अध्यक्ष, जिल्हा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. जून महिन्यातील सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी समन्वय, संघटनशक्ती आणि जनसंपर्काच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# पत्रकार - पोलीस समन्वय अधिक दृढ करण्याचा निर्धार

## जाफ्राबाद येथे पोलीस अधीक्षक तेजबीर सिंग सिंधू यांचा सत्कार



**(दत्ता देशमुख)**

मराठी पत्रकार संघ, जाफ्राबाद यांच्या वतीने दि. २ जून रोजी जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक तेजबीर सिंग सिंधू यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार व पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक बळकट करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

या प्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन काटेकर, पोलीस निरीक्षक सतीश जाधव, ज्येष्ठ पत्रकार मोहन मुळे, मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष मुकेश भरद्वाज, पत्रकार सलमान पठाण, चेतन बयास, मंगल भरद्वाज, शेख अय्युब, शेख कदीर, प्रल्हाद लोणीकर, रेस्पॉन्सिअल ऑफ महाराष्ट्राचे शेख आशपाक, तसेच इतर पत्रकार उपस्थित होते. सत्कारानंतर झालेल्या चर्चे दरम्यान जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था, नागरिकांच्या सुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच पत्रकार आणि पोलीस प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने विचारविनिमय करण्यात आला. सम ाजहितासाठी पत्रकार आणि पोलीस यांच्यातील परस्पर सहकार्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

यावेळी पत्रकारांनी स्थानिक पातळीवरील विविध प्रश्न उपस्थित केले. त्यावर पोलीस अधीक्षक (पान २ वर)

# श्रीमती. जे.बी.के. विद्यालयाच्या दोन अग्री विरांची निवड

**दत्ता देशमुख**

टेंभूर्णी येथील नवभारत शिक्षण संस्था द्वारा संचालित श्रीमती.जे. बी.के.विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयातील शंतनू भागवत गोरे, व तुषार ज्ञानेश्वर गोरे या दोन माजी विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यासातील मेहनत, कठोर शारीरिक परिश्रम, जिद्द, चिकाटीच्या जोरावर भारतीय सैन्यदलात अग्री विर म्हणून नियुक्ती मिळवली आहे. हे दोन ही विद्यार्थी गोंधनखेडा येथील सामान्य शेतकरी कुटुंबातील असुन, दोघांनी ही देश सेवेसाठी सैन्यदलात जाण्याचे



ध्येय उराशी बाळगले होते. त्यांचे स्वप्न साकार होत असतांना आई -वडील, व गावकरी यांचा आनंद ओसंडून वहात आहे, हे गुणी, हुशार, प्रामाणिक विद्यार्थी कुठल्याही व्यसनाला बळी न पडता,त्यांनी शारीरिक कसरती वर जोर दिला. मोबाईलच्या फसव्या जाळ्यात न अडकता, अभ्यासाला महत्व दिले. दररोज सकाळी चार ते पाच किलोमीटर धावणे, शारीरिक कसरत करणे, आरोग्याच्या, आहाराच्या , चांगल्या सवयी बाळगणे. या जोरावर या विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले आहे. आणि गावातील तरूणांपुढे एक आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या निवडीचे, नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष. संजय काबरा, उपाध्यक्ष. जमिर शेख सर, सचिव. सत्यनारायण सोनी,जेष्ठ संचालक. मधुकर निकम, संचालक. सुभाषचंद्र राठी, प्रदिप काबरा, प्रदिप मुळे,संचालक. विष्णूभाऊ सांगुळे,संचालक प्रा.दत्ताराव देशमुख, शेषराव मुळे,भगवान डोईफोडे,मुख्याध्यापक संजय कुलकर्णी, पर्यवेक्षक.भिवसन ससाणे, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख. एस. बी. बोरकर, विष्णू जाधव, रमेश इंगळे, क्रिडविभाग (पान २ वर)

# जाफ्राबाद तालुक्यातीलजवखेडा ढेंग येथे राम चरित्र चिंतन कथेचे आयोजन

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील जवखेडा ठेंग येथील श्री जनेश्वर महादेव मंदिर तथा श्री राष्ट्रसंत सगुरू जनार्दन स्वामी गोसेवा आश्रम येथे श्री राम चरित्र चिंतन कथेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा आध्यात्मिक ज्ञानयज्ञ दिनांक ४ ते १० जून या कालावधीत संपन्न होणार असून परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या पवित्र कथामालेसाठी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर नाशिक येथील प्रसिद्ध कथाकार हभप. श्री भाऊ पाटील हे कथाचार्य म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. श्रीराम चरित्रातील आदर्श, भक्ती, धर्म आणि संस्कार यांचे चिंतन करून भाविकांना अध्यात्माची गोडी लावण्याचे कार्य या कथेमार्फत होणार आहे. या कार्यक्रमास शितल संत परमपूज्य श्री महेशगिरीजी बाबा, स्वरसम्राट परमपूज्य श्री राघवगिरीजी बाबा तसेच परमपूज्य श्री ज्ञानेश्वर माऊली (श्री ज्ञानेश्वर आश्रम, जवखेडा) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.



त्यांच्या आशीर्वचनांमुळे आणि मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाची शोभा अधिक वाढणार आहे. सप्ताहभर दररोज भजन, कीर्तन, प्रवचन आणि चालणाऱ्या या कथेमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून भाविकांनी मोठया संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन श्री जनार्दन स्वामी भक्त मंडळाच्या भोकरदन, जाफ्राबाद शाखेच्यावतीने करण्यात आले आहे. संपूर्ण परिसरातील रामभक्त आणि श्रद्धाळू नागरिकांनी या कथासोहळ्यास उपस्थित राहून धर्म, संस्कार आणि अध्यात्माचा लाभघ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील मुला-मुलींना शासकीय निवासी शाळांमध्ये प्रवेशासाठी सुवर्णसंधी

**जालना - प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील अनुसूचित जाती व नवबौद्ध समाजातील मुला-मुलींना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक तालूक्यात एक शासकीय निवासी शाळा सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आर्थिक परिस्थितीमुळे अनेक विद्यार्थ्यांना उच्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षण घेणे कठीण जाते. ही अडचण दूर करण्यासाठी राज्य शासनाने प्रत्येक तालुक्यात शासकीय निवासी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जालना जिल्ह्यात अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या मुलींसाठी जालना येथे, मुलांसाठी बदनापूर येथे तसेच भोकरदन येथे शासकीय निवासी शाळा कार्यरत आहेत.

या निवासी शाळांमध्ये इयत्ता सहावीपासून प्रवेश दिला जातो. प्रत्येक शाळेत सुमारे २०० मुले-मुली शिक्षण घेत असून विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य तसेच इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीही नियमानुसार जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत. रिक्त जागांवर गुणवत्तेनुसार व पात्रतेच्या आधारे प्रवेश दिला जाणार (पान २ वर)

# अल्पवयीन मुलांच्या मालमत्ता व्यवहारात स्पष्ट फायदा महत्त्वाचा, तांत्रिक मुद्दे गौणः सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

**जालना - प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने बुधवार, ३ जून रोजी एका महत्त्वपूर्ण निकालात स्पष्ट केले आहे की, अल्पवयीन मुलांच्या मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी नैसर्गिक पालकांनी केलेल्या अर्जांची तपासणी करताना न्यायालयांनी तांत्रिक किंवा काल्पनिक कारणांवर भर देण्याऐवजी, प्रस्तावित व्यवहारात अल्पवयीन मुलाचा ''स्पष्ट फायदा'' आहे की नाही, याचे वास्तववादी मूल्यांकन करणे आवश्यक आहे. हा निर्णय हिंदू अल्पसंख्याक आणि पालकत्व कायदा, १९५६ च्या कलम ८ अंतर्गत दाखल झालेल्या प्रकरणावर देण्यात आला. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती नोंगमेइकपम कोटीस्वर सिंह यांच्या खंडपीठाने शेफाली चक्रवर्ती विरुद्ध पश्चिम बंगाल सरकार या खटल्यात हा निकाल दिला. न्यायालयाने नमूद केले की, ''संबंधित न्यायालयाने यावर बारकाईने लक्ष दिले पाहिजे की प्रस्तावित व्यवस्थामुळे मुलाच्या वर्तमान किंवा भविष्यातील हक्कांवर कोणताही परिणाम होणार नाही. मुलाचे सर्वोत्तम हित हे केवळ एक निष्क्रिय विचार नसून एक सशक्त तत्त्व आहे, ज्यासाठी दूरदृष्टी, सावधगिरी आणि प्रत्येक बाबीची सूक्ष्म तपासणी आवश्यक आहे.'' हे प्रकरण एका आईने तिच्या अल्पवयीन मुलाच्या वडिलोपार्जित मालमत्तेतील अविभक्त हिश्याच्या विकासासाठी एका विकासकाशी करार करण्याची परवानगी मागितलेल्या अर्जाशी संबंधित होते. या विकास करारानुसार, मुलाला ३९९.३३ चौरस फुटांच्या फ्लॅटमध्ये एक तृतीयांश हिस्सा आणि १० लाख रुपये मिळणार होते. जिल्हा न्यायालय आणि उच्च न्यायालयाने हा अर्ज फेटाळला होता, कारण आई मुलासाठी ''गरज'' किंवा ''स्पष्ट फायदा'' सिद्ध करू शकली नाही. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात कलम ८ संबंधी अनेक महत्त्वपूर्ण तत्त्वे स्पष्ट केली. न्यायालयाने म्हटले की, कलम ८ हे नैसर्गिक पालकांच्या अधिकारांवर वैधानिक बंधन घालते आणि मालमत्तेच्या हस्तांतरणासाठी न्यायालयाची पूर्वपरवानगी अनिवार्य करते. परवानगीशिवाय केलेला व्यवहार सुरुवातीपासून अवैध नसतो, तर तो अल्पवयीन मुलाच्या इच्छेनुसार रद्द करण्यायोग्य असतो. सज्ञान झाल्यानंतर कायद्याने ठरवून दिलेल्या मुदतीत मुलाला हा व्यवहार रद्द करण्याचा अधिकार मिळतो. न्यायालयाची परवानगी देण्याची अट मुलाच्या कल्याणावर आधारित असून, व्यवहार आवश्यक किंवा मुलासाठी फायदेशीर आहे की नाही हे तपासूनच निर्णय घेतला (पान २ वर)

# परळी वैजनाथ येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना भावपूर्ण अभिवादन



**परळी वैजनाथ - प्रतिनिधी**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त परळी वैजनाथ येथील त्यांच्या स्मृतीस्थळावर शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली. यावेळी लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहुल केंद्रे माजी जिल्हा परिषद सदस्य रामराव खेडकर (मामा), देऊळगाव राजा येथील भाजप नेते डॉ. सुनील कायंदे, रामेश्वर दराडे, देवा ढाकणे, उद्धव गीते, दिनकर बारगजे, सुहास मुंडे, एकनाथराव जायभाये, नितीन कायंदे, राहुल चाटे, दीपक कायंदे आदी मान्यवर उपस्थित होते. (पान २ वर)

# जिल्हाअधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या आदेशाने आयुष्यमान भारत केवायसी करण्याचे आदेश

**दत्ता देशमुख**

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी ग्रामपंचायत येथे आयुष्यमान भारत ही केवायसी कॅम्प आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत वय वंदना कार्ड केवायसी निर्मलाची विशेष आयुष्यमान भारत कार्ड रू ५ लाख किमतीचे मोफत उपचार देशातील कोणतेही सुचिबध्द सरकारी किंवा खाजगी रुग्णालयात करण्यात ५ लाखापर्यंत मोफत उपचार




देशातील कोणतीही सुचिबध्द सरकारी किंवा खाजगी रुग्णालयात इयत्ता सादर योजना लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थी कुटुंबातील प्रत्येक सदस्याला आयुष्यमान कार्ड असेल तर योजनेचा फायदा होतो दि.०५ जून २०२६ ते २० जून २०२६ दरम्यान राबविण्यात येणार आहे ज्या लाभार्थ्याची आयुष्यमान भारत ही केवायसी राहिली असेल त्यांनी लवकरात लवकर स्वस्त धान्य दुकानदार ग्रामपंचायत कम्प्युटर ऑपरेटर आशा वर्कर यांच्याकडून (पान २ वर)

# महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रुपम घुगे यांच्या वाढदिवसानिमित्त झाडे, गो-शाळेत चारा वाटप : विविध उपक्रमांनी साजरा

**जालना -प्रतिनिधी**

शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख रुपम रमेश घुगे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त कुठल्याही प्रकारची बॅनरबाजी न करता व उधळपट्टी न करतांना सामाजिक कार्यक्रम व झाडे, गो-शाळेत चारा वाटप, लहान बाळांना कपडे वाटप करुन साजरा केला. रुपम घुगे यांनी वाढदिवसानिमित्त वाल्हा गणपतीच्या पवित्र चरणी दर्शन घेऊन श्रींचे आशीर्वाद घेतले.



तसेच राजूर गणपती येथे बप्पा चरणी आरती व अभिषेक करण्यात आला. यावेळी वृक्ष वाटप करतांना रुपम घुगे म्हणाल्या की, आजच्या वातावरणात होणाऱ्या बदलावामुळे पर्यावरणाचा होणाऱ्या ऱ्हास यावर विचार करण्याची गरज आहे. आज आपण जसे आपल्या पाल्यांना लहानचे मोठे करण्यासाठी जीव लावतो तसेच वृक्ष लागवड करुन त्याची देखरेख करुन वाढ करावी, असेही त्या म्हणाल्या. जालना येथील महिला जिल्हा रुग्णालयात पर्यावरण संवर्धन व स्वच्छतेचा संदेश देणारा उपक्रम राबविण्यात आला. रुग्णालयातील प्रत्येक कर्मचाऱ्यास वृक्षरोपांचे वितरण करण्यात आले. तसेच विविध वॉर्डमध्ये डस्टबिन व आकर्षक इनडोअर प्लांट्स देऊन स्वच्छ, सुंदर व हरित रुग्णालय परिसर निर्मितीस हातभार लावण्यात आला.

जिल्हा महिला व बाल रुग्णालयास भेट देऊन रुग्ण व त्यांच्या (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.